(20)

## अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:-१६.६.२००५.

मुंबई विद्युत शुल्क अधिनियम, १९५८

क्र.सीपीपी-२००४/प्र.क्र.३९३/ऊर्जा-१.- मुंबई विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई चाळीस ) यांच्या कलम ५ अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि यासंदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन आणि शासन अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. इएलडी-२००१/प्र.क्र. १०६९/ ऊर्जा-१, दिनांक ४ एप्रिल, २००१ चे अधिक्रमण करुन, महाराष्ट्र शासन याव्दारे उद्योग चालविणाऱ्या व्यक्तिने स्वतःच्या उद्योगासाठी, जनित्र संचाव्दारे निर्माण केलेल्या वीजेचा वापर केल्यास, अशा वीज वापरावर दिनांक १ मे, २००५ पासून पुढील ५ वर्षाच्या कालावधीकरिता उक्त अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग "ग" स्तंभ "ब" खालील संपूर्ण विद्युत शुल्क भरण्यापासून सूट देत आहे.

20 JUN 2005

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र.बा. पाटील,
शासनाचे उप सचिव.

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग-४ ब मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या १०० प्रती या विभागास पाठवाव्यात.

( प्र. बा. पाटील)
शासनाचे उप सचिव.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी-
अध्यक्ष,म.रा.वि. मंडळ,प्रकाशगड, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१.
व्यवस्थापकीय संचालक, टाटा विद्युत कंपनी,बॉम्बे हाऊस, होमी मोदी स्ट्रीट,फोर्ट,
मुंबई-४००००१.
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,रिलायन्स एनर्जी लि.,रिलायन्स एनर्जी सेंटर,सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई-४०००५५.
महाव्यवस्थापक,बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम ,बेस्ट भवन,बेस्ट मार्ग,टपाल पेटी
क्रमांक १९२, मुंबई-४००००१.
कार्यकारी संचालक, मुळा प्रवरा इलेक्ट्रिक कॉ.ऑ.सोसायटी,श्रीरामपूर, जि.अहमदनगर.
मुख्य अभियंता (विद्युत), महाराष्ट्र शासन, सा.बां.वि, प्रशासकीय इमारत, ३रा मजला, रामकृष्ण
चेंबूरकर मार्ग. चेंबूर (पूर्व).मुंबई-७१.